# अमोलक शिक्षण संस्थेची अमोलक फेस्टिव्हलच्या माध्यमातून दोन दिवसाची सांस्कृतिक मेजवानी

कडा :(प्रतिनिधी) अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व शाखांचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. स्त्रीभृण हत्येवर आधारित नाटिका, एकतर्फी प्रेमातून मुलींवर होणारे असिड हल्ला यासारख्या समस्येवर आधारित नाटिका सादर करून समाज जागृती करण्याचा प्रयत्न या स्नेह संमेलनातून करण्यात आला. कविता, नाटच, नृत्य, सर्वधर्मसमभाव गीते यामुळे कडावासियांना सांस्कृतिक मेजवानी मिळाली. अमोलक जैन शिक्षण संस्थेच्या विविध विद्या शाखांचे एकत्रित स्नेहसंमेलन अमोलक फेस्टिव्हल म्हणून दरवर्षी साजरे करण्यात येते. या फेस्टिव्हल मध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या फेस्टिव्हलचे उद्‌घाटन संस्थेचे अध्यक्ष गोकुळदास मेहेर यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष कांतीलाल चानोदिया, कार्याध्यक्ष योगेश भंडारी, प्रधानमंत्री हेमंतकुमार पोखरणा, कोषाध्यक्ष अनिल झाडमुथ्था, समन्वयक डॉ महेंद्र पटवा, कार्यकारणी सदस्य पोपटलाल भळगट, सरपंच दीपमाला ढोबळे, सरपंचपती अनिल ढोबळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, सभापतीपती शिवराज पाटील यांच्यासह संस्थचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. दोन दिवसीय कार्यक्रमात मोतीलाल कोठारी विद्यालयातील विद्यार्थिनीनी स्त्रीभृण पान ६ वर



...जाधव यांना कळ.

# अमोलक शिक्षण संस्थेचे स्नेहसंमेलन

## कडा येथे चिमुकल्यांनी सादर केले विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम

**कडा, ता. ९ (बातमीदार) :** अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व शाखांचे स्नेहसंमेलन ता. ७ आणि ता. ८ रोजी उत्साहात पार पडले. स्त्रीभ्रूणहत्येवर आधारित नाटिका, एकतर्फी प्रेमातून मुलींवर होणारे ॲसिड हल्ले यासारख्या समस्यांवर आधारित नाटिका सादर करून समाजजागृती करण्याचा प्रयत्न या स्नेहसंमेलनातून करण्यात आला. कविता, नाट्य, नृत्य, सर्वधर्म समभाव गीते यामुळे कडावासीयांना दोन दिवस सांस्कृतिक मेजवानी मिळाली.



कडा : अमोलक विद्यालयात विविध गुणदर्शन सादर करताना विद्यार्थी.

अमोलक जैन शिक्षण संस्थेच्या विविध विद्या शाखांचे एकत्रित स्नेहसंमेलन 'अमोलक फेस्टिव्हल' म्हणून दरवर्षी साजरे करण्यात येते. या फेस्टिव्हलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या फेस्टिव्हलचे उद्‌घाटन संस्थेचे अध्यक्ष गोकुळदास मेहेर यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष कांतीलाल चानोदिया, कार्याध्यक्ष योगेश भंडारी, प्रधान मंत्री हेमंतकुमार पोखरणा, कोषाध्यक्ष अनिल झाडमुथ्था, समन्वयक डॉ. महेंद्र पटवा, कार्यकारिणी सदस्य पोपटलाल भळगट, सरपंच दीपमाला ढोबळे, अनिल ढोबळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, शिवराज पाटील यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. 'अमोलक फेस्टिव्हल' यशस्वी करण्यासाठी मोतीलाल कोठारी विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत राऊत, रसिकलाल धारीवाल फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश बाफना, गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पाताळे, उपप्राचार्य ज. मो. भंडारी, चंदनमल भळगट प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका हिराबाई कसरे, बचपन स्कूलच्या श्रीमती महामुनी, बालवाडीच्या श्रीमती कुलकर्णी, श्रीमती देशमुख, श्रीमती सोनवणे यांनी पुढाकार घेतला.

पुण्य नगरी
रविवार, ११ फेब्रुवारी २०१८ | बीड

Shri Amolak Jain Vidhya Prasarak Mandal's
Gandhi Arts, ...
LIBRARY

# अमोलक फेस्टिव्हलमध्ये सांस्कृतिक मेजवानी

कडा (प्रतिनिधी): अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व शाखांचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. सध्याच्या समस्येवर आधारित नाटिका सादर करून समाज जागृती करण्याचा प्रयत्न या स्नेह संमेलनातून करण्यात आला.

फेस्टिव्हलचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष गोकुळदास मेहेर यांच्या हस्ते झाले. यावेळी कांतीलाल चानोदिया, योगेश भंडारी, हेमंतकुमार पोखरणा, अनिल झाडमुथ्था, डॉ. महेंद्र पटवा, पोपटलाल भळगट, सरपंच दीपमाला ढोबळे, अनिल ढोबळे, सभापती रमजान तांबोळी,



शिवराज पाटील सह संस्थचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. पहिल्या दिवशी सर्व शाखांनी एकत्र गावातून शोभायात्रा काढण्यात आली यामध्ये मुलांनी शेतकरी आत्महत्या, गणपती उत्सव, डिजिटल इंडिया, यांचे देखावे यासह ग्रंथदिंडी काढण्यात आली. कड्याचे दैवत मौलाली बाबा यांचा संदल विद्याथ्यानी काढला. अमोलक फेस्टिव्हल यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक भारत राऊत, रसिकलाल धारिवाल, प्राचार्य योगेश बाफना, प्राचार्य डॉ. पाताळे, उपप्राचार्य ज.मो.भंडारी, मुख्याध्यापिका हिराबाई कसरे, महामुनी, कुलकर्णी, देशमुख, सोनवणे सह शिक्षक, शिक्षेकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Shri Amolak Jain Vidhya Prasarak Mandal's ... College, Kada
LIBRARY

झुंजार नेता
दिनांक : १४ फेब्रुवारी २०१८ | वार : बुधवार

# मोलक शिक्षण संस्थेचा अमोलक फेस्टिव्हल उत्साहात संपन्न

:(प्रतिनिधी) अमोलक जैन विद्या ...डळाच्या सर्व शाखांचे स्नेहसमेलन मोठ्या ...पार पडले. स्त्रीभृण हत्येवर आधारित ...एकतर्फी प्रेमातून मुलींवर होणारे असिड ...रख्या समस्येवर आधारित नाटिका सादर ...माज जागृती करण्याचा प्रयत्न या स्नेह ...तून ... करण्यात ...कविता, नाट्य, नृत्य, सर्वधर्मसमभाव गीते ...कडावासियांना सांस्कृतिक मेजवानी ... अमोलक जैन शिक्षण संस्थेच्या विविध ...शाखांचे एकत्रित स्नेहसंमेलन अमोलक ...ल म्हणून दरवर्षी साजरे करण्यात येते. या ...ल मध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव ...ठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ...टिव्हलचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष गोकुळदास मेहेर यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष कांतीलाल चानोदिया, कार्याध्यक्ष योगेश भंडारी, प्रधानमंत्री हेमंतकुमार पोखरणा, कोषाध्यक्ष अनिल झाडमुथ्था, समन्वयक डॉ महेंद्र पटवा, कार्यकारणी सदस्य पोपटलाल भळगट, सरपंच दीपमाला ढोबळे, सरपंच अनिल ढोबळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, सभापती शिवराज पाटील , माजी सरपंच संपत सांगळे यांच्यासह संस्थचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. दोन दिवसीय कार्यक्रमात मोतीलाल कोठारी विद्यालयातील विद्यार्थिनीनी स्त्रीभृण हत्येवर आधारित नाटिका, एकतर्फी प्रेमातून मुलींवर होणारा असिड हल्ला याचे चित्रण प्रेक्षकासमोर ठेवले. रसिकलाल धारिवाल फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने देशभक्तीपर गीते आणि शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवाचा सोहळा रंगमंच्यावर सादर करण्यात आला. गांधी महाविद्यालयातील विद्यार्थिनीने सादर केलेल्या रिमिक्स लावणी वर प्रेक्षकांनी चांगला ठेका धरला. बचपन इंग्लिश स्कूलच्या मुलांनी देशभक्तीपर आधारित इंडियावाले' गाणे बालवाडीच्या मुलांनी पितृप्रेमावर आधारित मुझे माफ करना ओ साईराम' ही गाणे नृत्यावर आधारित सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली. चंदनमल भळगट प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी नन्हा मुन्ना राही हु' गीत सादर करून बालसैनिक उभे केले. पी एम मुनोत कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी हर्षवर्धन थेटे याने गीत गायन केले. पहिल्या दिवशी सर्व शाखांनी एकत्र गावातून शोभायात्रा काढण्यात आली यामध्ये मुलांनी शेतकरी आत्महत्या, सर्व धर्म समभाववेशभूषा करण्यात आली, गणपती उत्सव, डिजिटल इंडिया, यांचे देखावे यासह ग्रांथदिंडी काढण्यात आली. कड्याचे दैवत मौलाली बाबा यांचा संदल विद्यार्थ्यानी काढला .अमोलक फेस्टिव्हल यशस्वी करण्यासाठी मोतीलाल कोठारी विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत राऊत, रसिकलाल धारिवाल फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश बाफना, गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पाताळे, उपप्राचार्य ज.मो.भंडारी चंदनमल भळगट प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती हिराबाई कसरे, बचपन स्कूलच्या श्रीमती महामुनी, बालवाडीच्या श्रीमती कुलकर्णी, श्रीमती देशमुख, श्रीमती सोनवणे यांच्यासह शिक्षक, शिक्षेकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

दैनिक लोकाशा महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

गुरूवार दि.११ जानेवारी २०१८

# आयुष्यात पुस्तके ही कुशल तज्ञाचं काम करतात-डॉ.पाटील

## अमोलक जैन शिक्षण मंडळ,नागेबाबा मल्टीस्टेट, अजय प्रकाशनचे कड्यात पुस्तक प्रदर्शन



कडा, दि.१० (प्रतिनिधी):- जीवनात यश संपादन करण्यासाठी पुस्तके ही कुशल तज्ञाचं काम करित असतात.त्यामुळे परिपूर्ण नागरिक घडविण्यासाठी पुस्तक महत्वाचं माध्यम असल्याचे प्रतिपादन आष्टीचे विभागीय पोलिस अधिकारी डॉ.अभिजित पाटील यांनी केले.

कडा येथील अमोलक जैन शिक्षण मंडळ, नागेबाबा मल्टीस्टेट व अजब प्रकाशन कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनांच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अभिजित पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य डॉ. हरिदास विधाते,योगेश बाफना, अजब प्रकाशनचे मनोज सांळुके, संस्थेचे अध्यक्ष गोकुळदास मेहेर, उपाध्यक्ष कांतीलाल चानोदीया, सचिव हेमंत पोखरणा,योगेश सुरासे, सामाजिक कार्यकर्ते अनिल ढोबळे, डॉ.उमेश गांधी, संजय मेहेर,अनिल मुथ्था, आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाले की, वाचाल तर वाचाल ही एक म्हण मराठीत परिचित असून ज्यांना या म्हणीचा अर्थ समजलाय ती माणसं आपापल्या क्षेत्रात यशस्वी झालेली आहेत. त्यामुळे जीवनात खऱ्या अर्थाने यश संपादन करायचं असेल तर वाचन संस्कृती जतन करण्याची आवश्यकता आहे. याप्रसंगी प्राचार्य डॉ.विधाते,हेमंत पोखरणा यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे विधीअधिकारी भरत दारूंटे, सुत्रसंचालन प्रा. संकेत गांधी यांनी केले तर आभार घनश्याम जगताप यांनी मानले. उदघाटनप्रसंगी प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कड्यात मुलींसाठी आरोग्य शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कडा :** येथील अमोलक शिक्षण संस्थेत सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशिनचे उदघाटन करण्यात आले, तर मुलींसाठी आरोग्य शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते.

कडा येथील अमोलक शिक्षण संस्थेत आर. एम. धारीवाल फार्मसी कॉलेजच्या वतीने शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी आरोग्य मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. डॉ. मंजुश्री टेकाडे आणि डॉ. कविता भळगट यांनी यावेळी मुलींना मासिक पाळी, त्या काळातील काळजी, पॅड वापरण्याचे फायदे, ब्रेस्ट कॅन्सर, तसेच वैयक्तिक स्वच्छता व त्याची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी अमोलक शिक्षण संस्थेच्या मोतीलाल कोठारी विद्यालय, आर. एम. धारीवाल फार्मसी कॉलेज, मुनोत कनिष्ठ महाविद्यालय आणि बीसीए कॉलेजच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. महाविद्यालयात बसवण्यात आलेल्या सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशिनचे उद्घाटन देखील यावेळी करण्यात आले. प्रास्तविकात प्रा. मधुराणी राऊत यांनी या मशीनच्या वापराचे प्रात्यक्षिक दाखवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुजाता काळे यांनी केले, तर आभार प्रा औताडे यांनी मानले.